RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ८, अंक ९४(४)] शुक्रवार, ऑक्टोबर २१, २०२२/आश्विन २९, शके १९४४ [पृष्ठे २३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १९९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महिला व बाल विकास विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ ऑक्टोबर २०२२.

**अधिसूचना**

**बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६.**

क्रमांक बालवि-२०२०/प्र.क्र.६२/का-९.—बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ (२००७ चा ६) याच्या कलम १९ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध नियम, २००८ चे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील नियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांस, महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध नियम, २०२२ असे म्हणावे.

२. **व्याख्या.**— (१) या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ, अपेक्षित नसेल तर,-

(क) "अधिनियम" याचा अर्थ, बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ (२००७ चा ६), असा आहे;

(ख) "बाल कल्याण समिती" याचा अर्थ, बाल न्याय अधिनियमाच्या कलम २७ अन्वये गठित केलेली बाल कल्याण समिती, असा आहे;

(ग) "नमुना" याचा अर्थ, या नियमांस जोडलेला नमुना, असा आहे;

(घ) "बाल न्याय अधिनियम" याचा अर्थ, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ (२०१६ चा २), असा आहे;

(२) या नियमांत वापरलेले परंतु यामध्ये व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, अधिनियमात अनुक्रमे जे अर्थ नेमून दिले असतील तेच अर्थ असतील.

**३. बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याची कर्तव्ये.—**

(१) अधिनियमाच्या कलम १६ च्या पोट-कलम (३) मध्ये नमूद केलेल्या कर्तव्यांव्यतिरिक्त, बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी, पुढील कार्ये व कर्तव्ये पार पाडील :–

(क) बाल विवाहास रोखण्यासाठी, बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी,–

(एक) विवाहाची अनिवार्यपणे नोंदणी करण्याबाबत जनजागृती करील;

(दोन) शाळा सोडणाऱ्या मुलींची नियमित आकडेवारी गोळा करील व तिची पडताळणी करील;

(तीन) बाल विवाहाच्या प्रतिकूल परिणामांबाबत व बाल विवाहाच्या प्रश्नाबाबत समाजाला सचेतन करण्याकरिता जनजागृती निर्माण करील आणि बाल विवाहास प्रतिबंध करण्यासाठी बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याला, महिला व बालके यांचे संरक्षण करण्याच्या क्षेत्रातील व्यक्तींच्या किंवा समुपदेशक, वकील, आरोग्य सेवा प्रदाते, मानसशास्त्रज्ञ व्यावसायींच्या मदतीने,–

(क) वृत्तपत्र, प्रसार माध्यम आणि अन्य स्वरूपातील सर्व माध्यमांचा वापर करता येईल;

(ख) कायदा, सामाजिक कार्य, मानसशास्त्र, औषधवैद्यकशास्त्र, मनोचिकित्सा, आरोग्य सेवा प्रदाते यांमधील तज्ज्ञांचे आणि इतर तज्ज्ञांचे व्याख्यान आयोजित करता येईल;

(ग) जनजागृती मोहिमा व अभियाने आयोजित करता येतील;

(घ) शैक्षणिक संस्थांना भेटी देण्याचे आयोजन करता येईल.

(चार) जेव्हा मोठ्या प्रमाणात सामूहिक विवाह घडण्याची शक्यता असते अशा वेळी, होळी, अक्षय तृतीया यांसारख्या विशेष प्रसंगी प्रतिबंधक व्यूहनीती योजिण्यासाठी जिल्हा दंडाधिकाऱ्यास किंवा बाल न्याय अधिनियमान्वये स्थापन केलेल्या जिल्हा बाल संरक्षण कक्षास कळवील;

(पाच) बाल विवाहाशी संबंधित अपराध थांबविण्यासाठी पोलिसांना माहिती देईल व प्रथम खबरी अहवाल दाखल करील;

(सहा) बाल विवाह थांबवण्यासाठी यथोचित प्रतिबंधक उपाययोजना करण्याकरिता बाल कल्याण समितीस माहिती देईल;

(सात) महिला व बालकांच्या प्रश्नावर काम करणाऱ्या अशासकीय संघटना, समुपदेशक, आरोग्य सेवा प्रदाते, वकील, विधी सेवा प्राधिकरणे, इत्यादींसारख्या विविध हितसंबंधित व्यक्तींची सूची अद्ययावत ठेवील;

(आठ) बाल विवाहात सहभागी झालेल्या मुला-मुलींना, माता-पित्यांना, पालकांना शासनाच्या विविध योजनांविषयची माहिती देईल आणि लागू असलेल्या योजनांखालील लाभ मिळविण्यासाठी त्यांना अर्ज करण्यास सुचवील;

(नऊ) बालविवाह होण्याची शक्यता दूर करण्यासाठी त्याच्या अधिकारितेखालील क्षेत्रामध्ये दक्षता बाळगील;

(दहा) त्याच्या अधिकारक्षेत्रातील सामूहिक बाल विवाहासंबंधीची माहिती गोळा करील;

(अकरा) आपल्या गावामध्ये बालविवाह करण्याविरूद्ध ठराव मंजूर करण्यासाठी ग्रामसभेला प्रोत्साहित करील.

(ख) जेव्हा बाल विवाह विधी करण्यात येत असेल तेव्हा, बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी,—

(एक) बाल विवाह होण्याची शक्यता असल्याची विश्वसनीय माहिती त्यास प्राप्त झाली तर, तो अशा आकस्मिक परिस्थितीमध्ये, पोलिसांची किंवा बालकल्याण समितीची किंवा जिल्हा बाल संरक्षण कक्षाची तात्काळ मदत मागेल आणि घटनास्थळाला भेट देईल आणि बाल विवाहाच्या घटनेचा अहवाल, नमुना-एक मध्ये नोंदवील आणि अधिनियमान्वये यथोचित आदेश प्राप्त करण्यासाठी कोणताही विलंब न करता, तो, प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकाऱ्यास किंवा महानगर दंडाधिकाऱ्यास सादर करील;

(दोन) आकस्मिक परिस्थितीमध्ये बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यास दोन विश्वासार्ह साक्षीदारांच्या अथवा समाजातील सन्माननीय व्यक्तींच्या अथवा चाईल्ड लाईन सदस्यांच्या किंवा अशासकीय संघटनांच्या सदस्यांच्या उपस्थितीत, बाल विवाह विधी थांबविण्यासाठी जेथे बालविवाह होण्याची शक्यता असेल त्या स्थळाला भेट देता येईल;

(तीन) बालकांच्या वयाची पडताळणी करण्यासाठी कार्यवाही करेल;

(चार) अशा विवाहास प्रतिबंध करण्यासाठी व्यक्तींच्या संघटनेच्या किंवा संघाच्या सदस्यासह कोणत्याही व्यक्तीविरुद्ध अधिनियमाच्या कलम १३ अन्वये मनाई आदेश किंवा एकतर्फी अंतरिम मनाई आदेश मिळविण्यासाठी न्याय दंडाधिकाऱ्यासमोर किंवा महानगर दंडाधिकाऱ्यासमोर अर्ज दाखल करील;

(पाच) अधिनियमान्वये केलेल्या अपराधासंबंधात, न्यायिक दंडाधिकाऱ्याच्या किंवा यथास्थिति, महानगर दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयात अर्ज दाखल करण्यामध्ये पिडीत व्यक्तीला मदत करील;

(सहा) बाल कल्याण समितीस तात्काळ कळवील आणि गरज असेल तर, अशा बालकाला, शासन अर्थसहाय्यित निवासी शाळेत, आधारगृहात किंवा जेथे बाल न्याय अधिनियमाच्या तरतुदींनुसार काळजी व संरक्षणाची गरज असणाऱ्या बालकास ठेवता येईल अशा अन्य कोणत्याही सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी, बाल कल्याण समितीने दिलेल्या निदेशांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करील.

(ग) बाल विवाह संपन्न झाल्यानंतर, बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी,-

(एक) वयाचा पुरावा, लग्नपत्रिका, विवाहाची छायाचित्रे, इत्यादींसारखे सर्व पुरावे गोळा करील;

(दोन) या अधिनियमान्वये घडलेल्या अपराधांच्या बाबतीत, पोलिसांकडे किंवा न्याय दंडाधिकाऱ्याकडे, किंवा यथास्थिति, महानगर दंडाधिकाऱ्याकडे तक्रार दाखल करील;

(तीन) गरज असेल तर, बालकाची सुटका करण्यासाठी बाल कल्याण समितीचे सहाय्य घेईल आणि बाल कल्याण समितीने निदेश दिल्याप्रमाणे आवश्यक ती काळजी घेईल व संरक्षण करील;

(चार) समुपदेशन, आरोग्याची काळजी, आधार गृह, कायदेशीर सहाय्य, इत्यादींसारख्या सेवा मिळवून देण्यात बालक, आईवडील, पालक यांना सहाय्य करील;

(पाच) अधिनियमान्वये घडलेल्या अपराधासंबंधी न्यायदंडाधिकारी न्यायालयात, किंवा यथास्थिति, महानगर दंडाधिकारी न्यायालयात अर्ज दाखल करताना पीडित व्यक्तीला सहाय्य करील;

(सहा) विवाह शून्यतेच्या हुकूमनाम्याद्वारे बाल विवाह रद्द ठरविण्यासाठी विनंती अर्ज दाखल करण्यात सहाय्य करील; आणि विनंती अर्ज दाखल करते वेळी, विनंती अर्जदार अज्ञान असेल तर, कलम ३ च्या पोट-कलम (२) च्या तरतुदींनुसार त्याच्या किंवा तिच्या पालकासह किंवा ईष्टमित्रासह विनंती अर्ज दाखल करण्यात सहाय्य करील;

(सात) जेथे बालक अज्ञान असेल तेथे,-

(क) त्याला कायदेशीर पालकाच्या ताब्यातून काढून घेतले आहे किंवा फूस लावून नेण्यात आले असेल, किंवा

(ख) जबरदस्तीने भाग पाडले असेल; किंवा

(ग) त्याला एखाद्या जागेतून निघून जाण्यास कपटाने प्रवृत्त केले असेल; किंवा

(घ) विवाहाच्या प्रयोजनासाठी त्याची विक्री करण्यात आली असेल आणि कोणत्याही प्रकारे विवाह करण्यास त्याला भाग पाडले असेल; किंवा

(ङ) विवाह केला असेल आणि त्यानंतर विक्री केली आहे किंवा अनैतिक प्रयोजनांसाठी अपव्यापार किंवा वापर केला असेल,

अशा कोणत्याही विधीपूर्वक लावण्यात आलेल्या बाल विवाहाची त्यास माहिती झाल्यास, अनैतिक व्यापार(प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०४) अन्वये नियुक्त केलेल्या विशेष पोलीस अधिकाऱ्यासह पोलीस प्राधिकाऱ्यांना यांबाबत माहिती देईल.

**४. पोलीस, पदनिर्देशित पोलीस आणि विशेष बाल पोलीस पथक यांची कर्तव्ये.—** पोलीस, पदनिर्देशित पोलीस आणि विशेष बाल पोलीस पथक यांची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(क) बाल विवाह विधी होण्यास प्रतिबंध करण्यासाठी या अधिनियमान्वये आणि त्याखालील केलेल्या नियमांन्वये विनिर्दिष्ट केलेली बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याची कर्तव्ये पार पाडताना त्यांना सहाय्य करणे;

(ख) बाल विवाहाबद्दल माहिती मिळाल्यावर, पोलीस त्याची नोंद ठाण्याच्या दैनंदिनीत करतील व साक्षीपुरावा गोळा करतील;

(ग) बालविवाह विधिपूर्वक पार पडल्याबद्दल विश्वसनीय सूत्रांकडून माहिती मिळाल्यावर प्रथम खबरी अहवाल (एफ आय आर) नोंदवणे;

(घ) या नियमांन्वये बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याकडून माहिती मिळाल्यावर समुचित कायद्यान्वये तात्काळ कारवाई करणे;

(ङ) आकस्मिक परिस्थितीत, जेथे बालविवाह विधिपूर्वक पार पडण्याची शक्यता असेल तेथे, बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याच्या विनंतीवरून त्याला सहाय्य करणे आणि अशा विवाह होण्याच्या ठिकाणी भेट देणे;

(च) न्यायालयाच्या आदेशांनुसार कारवाई करणे.

**५. बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यास माहिती देणे.—**

(१) जिला बाल विवाह विधिपूर्वक पार पडला आहे, किंवा होत आहे अथवा होण्याचा संभव आहे असा विश्वास ठेवण्यास कारण असेल अशी कोणतीही व्यक्ती, संघटना किंवा शैक्षणिक संस्था किंवा स्वतः बालक अथवा बालिका, पत्राद्वारे, इ-मेलद्वारे किंवा दूरध्वनीवरून किंवा चाईल्ड हेल्पलाईन क्रमांक १०९८ या क्रमांकावर संपर्क साधून किंवा इतर कोणत्याही माध्यमाद्वारे, एकतर लेखी किंवा तोंडी स्वरूपात, त्या क्षेत्रावर अधिकारिता असणाऱ्या बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यास किंवा अन्य कोणत्याही बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यास माहिती देऊ शकेल.

(२) जर एखादे बालक, शाळा प्राधिकाऱ्यांना काहीही न कळवता पंधरा दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी शाळेत गैरहजर असेल तर, अशा बालकाच्या गैरहजेरीचे कारण शोधून काढणे ही, शाळेच्या मुख्याध्यापकाची किंवा प्राचार्याची जाबाबदारी असेल आणि जर ते बाल विवाहामुळे गैरहजर असेल तर, शाळेचा प्राचार्य किंवा मुख्याध्यापक, ज्याच्या अधिकारितेमध्ये शाळा स्थित आहे त्या बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यास नमुना-दोन मध्ये कळवील.

(३) बाल विवाह विधिपूर्वक पार पडला आहे, पडत आहे किंवा पडण्याचा संभव आहे अशी माहिती मिळाल्यावर, बालविवाह प्रतिबंधक अधिकारी, बाल विवाहाच्या घटनेचा अहवाल नमुना-एकमध्ये तयार करील आणि तो, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यास किंवा महानगर दंडाधिकाऱ्यास सादर करील आणि ज्याच्या अधिकारितेमध्ये अभिकथित बाल विवाह विधिपूर्वक पार पडला आहे, पडत आहे किंवा पडण्याचा संभव आहे त्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी पोलीस अधिकाऱ्यास त्याच्या प्रती पाठवील.

(४) या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी, त्याच्या अधिकारितेबाहेरील क्षेत्रांमध्ये अभिकथित बाल विवाह विधिपूर्वक पार पडला आहे, पडत आहे किंवा पडण्याचा संभव आहे या कारणावरून बाल विवाहा संबंधीची माहिती नोंदविण्यास नकार देणार नाही. तो, माहिती नोंदवील आणि अशी माहिती, तात्काळ ई-मेल, दूरध्वनी, भ्रमणध्वनी संदेश किंवा संदेशवहनाच्या इतर कोणत्याही मार्गाने अधिकारिता असलेल्या संबंधित बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याकडे पाठवील.

(५) जर बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यास, कौटुंबिक हिंसाचाराबाबत तक्रार प्राप्त झाली असेल तर, तो, ती माहिती तात्काळ, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ (२००५ चा ४३) या अन्वये नियुक्त केलेल्या संबंधित संरक्षण अधिकाऱ्यास पाठवील.

(६) जर बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यास, विवाह झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या बालकांच्या लैंगिक अत्याचारासंबंधी तक्रार प्राप्त झाली तर, तो, ती माहिती लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ (२०१२ चा ३२) याच्या कलम १९ अन्वये तरतूद केलेल्या पोलीस अधिकाऱ्यास अनिवार्यपणे कळवील.

(७) बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी, बाल विवाहाच्या घटनेचा अहवाल, त्याच्या सहीनिशी तात्काळ माहिती देणाऱ्यास मोफत देईल.

(८) बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी, बाल विवाहाबद्दल त्याला माहिती देणाऱ्या व्यक्तीची अथवा संघटनांची गोपनीयता राखील. तथापि, अशी माहिती देणाऱ्या व्यक्तीच्या/व्यक्तींच्या अथवा संघटनेच्या जीवितास किंवा मालमत्तेस धोका असेल तर, तो अशा व्यक्तींची किंवा संघटनांची ओळख संबंधित पोलिसांकडे उघड करू शकेल.

**६. बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याकडून चौकशी.—** (१) बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी, जो घडला आहे किंवा घडण्याचा संभव असेल अशा या अधिनियमाखालील अपराधाबद्दल माहिती मिळाल्यावर, त्या प्रकरणाची चौकशी करील, त्यासाठी तो,

(क) ज्या जागेत बाल विवाह होण्याचा संभव आहे किंवा झाला आहे त्या जागेत प्रवेश करू शकेल आणि आवश्यक ती चौकशी करू शकेल;

(ख) जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा वधू व वराचे वय सिद्ध करणारे वैद्यकीय दस्तऐवज सादर करण्याची मागणी करू शकेल;

(ग) साक्षीदारांची आणि ज्या बाल विवाहाबाबत कोणत्याही प्रकारचा साक्षीपुरावा देऊ शकतील अशा इतर कोणत्याही व्यक्तींची जबानी नोंदवू शकेल;

(घ) ज्यांनी या अधिनियमाखालील कोणताही अपराध केला आहे अशा व्यक्तींवर खटला दाखल करण्यासाठी आवश्यक असेल असा इतर कोणताही पुरावा गोळा करू शकेल;

(ङ) त्या बालकासाठी ठेवलेल्या वैयक्तिक प्रकरण नस्तीमध्ये माहिती मिळाल्याची वेळ, चौकशी सुरू अथवा बंद केल्याचा दिनांक व वेळ, भेट दिलेली ठिकाणे आणि त्याच्या चौकशीतून निश्चित केलेल्या परिस्थितीचे निवेदन यांसह त्याच्या चौकशीचा व तिच्या प्रगतीचा तपशील नोंदवू शकेल;

(च) अशी प्रत्येक चौकशी तीन महिन्यांच्या आत पूर्ण करेल;

(२) चौकशी करताना, जर बालविवाह प्रतिबंधक अधिकारी, भारतीय दंड संहिता, १८६० (१८६० चा ४५) याखालील किंवा इतर कोणत्याही कायद्याखालील अपराध देखील केले आहेत अशा निष्कर्षाप्रत आला असेल तर, तो, याबाबतीत पुढील आवश्यक ती कारवाई करण्यासाठी संबंधित पोलीस अधिकाऱ्याला त्याबाबत कळवील.

**७. बालविवाहामध्ये सहभागी असलेल्या बालकाच्या वयाची पडताळणी.—**

(१) बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याला, ज्या बालकाचा विवाह होणार आहे त्या बालकाच्या वयासंबंधी वाजवी संशय असेल तर, तो पुढील दस्तऐवज मागवील :—

(क) शाळेच्या अभिलेखावरून किंवा उपलब्ध असल्यास, संबंधित परीक्षा मंडळाच्या मॅट्रिकच्या किंवा समतुल्य प्रमाणपत्रावरून जन्मतारखेची पडताळणी करणे आणि;

(ख) वरील खंड (क) मध्ये नमूद केलेले दस्तऐवज नसल्यास, स्थानिक प्राधिकरणाने दिलेला जन्म दाखला.

(२) जर कोणतेही दस्तऐवज उपलब्ध नसतील तर, तो, ते प्रकरण, वयाची पडताळणी करण्यासाठी बाल कल्याण समितीकडे पाठवू शकेल.

**८. बाल कल्याण समितीने अनुसरावयाची कार्यपद्धती.—**

(१) बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाल्यावर किंवा स्वाधिकारे, बाल कल्याण समिती, विवाहाचे वय पूर्ण होण्यापूर्वी ज्याचा विवाह केला जाण्याचा धोका आहे आणि ज्यांचे आई वडील, कुटुंबातील सदस्य, पालक आणि इतर कोणत्याही व्यक्ती/व्यक्ती, असा विवाह विधिपूर्वक करण्यासाठी जबाबदार असण्याचा संभव आहे, अशा बालकाच्या बाबतीत, बाल न्याय अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (१४) नुसार काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालक म्हणून विचार करील आणि बाल न्याय अधिनियमाच्या तरतुदींन्वये यथोचित कारवाई करील.

(२) बाल कल्याण समिती, अशा बालकाचे शिक्षण त्याच शाळेत निरंतरपणे सुरू राहिल याची सुनिश्चिती करील.

(३) जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा, बाल कल्याण समिती, अशा बालकांस बिगर-संस्थात्मक सेवा देण्याचा प्रथम प्रयत्न करील आणि संस्थात्मिकीकरण हा शेवटचा उपाय असेल.

(४) बाल कल्याण समिती, बालकाची सुरक्षा व संरक्षण याची सुनिश्चिती करील.

(५) बाल कल्याण समिती, बालकाशी संबंधित असलेल्या सर्व निर्णयांमध्ये बालकाचे "सर्वोत्तम हित" या तत्त्वाचे अनुसरण करील.

**९. बालकाची ओळख उघड न करणे.—**

(१) प्रसार-माध्यमे, वृत्तपत्रे, डिजीटल किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमे, बालकांचे हक्क व बाल विवाहाचे दुष्परिणाम याबाबत जनजागृती निर्माण करताना, बालकाची ओळख उघड न करता, बाल विवाहाबद्दल संवेदनशील रीतीने वृत्त देतील.

(२) बालविवाह प्रतिबंधक अधिकारी, बाल कल्याण समिती, बालकांची काळजी घेणारी संस्था,पोलीस किंवा इतर कोणतीही संघटना किंवा संस्था, बालकाची ओळख उघड करणार नाही.

**१०. बालविवाहातून जन्मलेल्या बालकांची अभिरक्षा व देखभाल.—**

(१) बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी, बालविवाहातून जन्मलेल्या बालकांची अभिरक्षा व देखभाल करण्यासाठी या अधिनियमाच्या कलम ५ खालील आदेश मिळण्याकरिता जिल्हा न्यायालयाकडे अर्ज करील.

(२) बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी, विवाहातील पक्ष किंवा पक्षकार किंवा त्यांचे पालक यांनी द्यावयाच्या बालकाच्या अभिरक्षेच्या व देखभालीच्या बाबतीतील जिल्हा न्यायालयाच्या आदेशांचे अनुपालन करण्यासाठी सहाय्य करील.

**११. अहवाल.—**(१) प्रत्येक बालविवाह प्रतिबंधक अधिकारी, त्याच्या अधिकारक्षेत्रात या अधिनियमान्वये व नियमांन्वये त्याने केलेल्या कारवायांबद्दलचा मासिक अहवाल, प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नमुना-तीन मध्ये जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यास सादर करील.

(२) प्रत्येक जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, त्याच्या अधिकारक्षेत्रात, या अधिनियमान्वये व नियमांन्वये त्याने केलेल्या कारवायांच्या बाबतीत, बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांने सादर केलेल्या मासिक अहवालाच्या आधारे, उप आयुक्त, बालविकास यांना नमुना-चार मध्ये त्रैमासिक अहवाल सादर करील.

**१२. कर्तव्याचे पालन न केल्याच्या बाबतीत कारवाई.—**जर, कोणताही बालविवाह प्रतिबंधक अधिकारी किंवा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, या अधिनियमामध्ये आणि या नियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्याच्या कर्तव्यांपैकी कोणतीही कर्तव्ये, पालन न करण्याची कोणतीही पुरेशी कारणे नसताना, पार पाडण्यात निःष्फळ ठरला असेल किंवा न्यायालयाच्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केले असेल तर, तो, या अधिनियमान्वये किंवा अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये इतर कोणत्याही कारवाया करण्याशिवाय, त्याला लागू असलेल्या संबंधित सेवा नियमांन्वये शिस्तभंगाच्या कारवाईच्या अधीन असेल.

## नमुना एक

**[नियम ३ (ख) (एक) व ५ (३) पहा]**

बाल विवाह घटना अहवाल

**क. बालकाचा तपशील :-**

| | |
|---|---|
| १. बालकाचे नाव | |
| २. वय | |
| ३. लिंग | |
| ४. बालकाच्या आईवडिलांचा निवासाचा पत्ता | |
| ५. बालकाच्या वडिलांचे नाव | |
| ६. वडिलांचा व्यवसाय | |
| ७. आईचे नाव | |
| ८. आईचा व्यवसाय | |
| ९. बालकाचा सध्याचा पत्ता | |

**ख. जेथे बालक शिकत आहे त्या शैक्षणिक संस्थेचा तपशील :-**

| | |
|---|---|
| १. शैक्षणिक/व्यावसायिक प्रशिक्षण संस्थेचे नाव | |
| २. शैक्षणिक संस्थेचा पत्ता | |
| ३. बालकाचा वर्ग | |
| ४. ती/तो शाळेत उपस्थित आहे का : | होय/नाही |
| ५. नसेल तर, बालकाने कोणत्या वर्षी शाळेत जाण्याचे बंद केले आहे : | |
| ६. जर तो/ती शाळेत जात नसेल तर, तो/ती सध्या काय करीत आहे, त्याचा तपशील द्या. | |
| ७. जर बालक कधीच शाळेत गेले नसेल तर, त्याची कारणे लिहा. | |

**ग. ज्या व्यक्तीविरुद्ध तक्रार/प्रथम खबरी अहवाल दाखल केला आहे त्या व्यक्तीचा तपशील.**

| अ.क्र. | नाव | बालकाशी असलेले नाते | दूरध्वनी क्रमांक | निवासाचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |

## घ. बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याद्वारे बाल विवाहाशी संबंधित माहिती मिळणे

| | |
|---|---|
| विवाहापूवी माहिती प्राप्त झाली होती का ? | होय/नाही |
| विवाह संपन्न होत असताना माहिती प्राप्त झाली होती का? | होय/नाही |
| विवाह संपन्न झाल्यानंतर माहिती प्राप्त झाली होती का? | होय/नाही |

## ङ बाल विवाहाच्या घटने/घटनांबद्दलचा तपशील :-

| अ.क्र. | दिनांक, वेळ व ठिकाण | बालविवाहासाठी जबाबदार असलेली व्यक्ती | घटनेचा तपशील | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

## च. बालकाला आवश्यक असलेले सहाय्य :-

| अ.क्र. | बालकाला आवश्यक असलेले सहाय्य | जिच्याकडून सहायता पुरवली जाते ती व्यक्ती/संघटना | इतर कोणताही/कोणतेही तपशील |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय सहाय्य | | |
| २. | विधि सहाय्य | | |
| ३. | समुपदेशन | | |
| ४. | पोलीस | | |
| ५. | आश्रय | | |
| ६. | इतर कोणतेही | | |

## छ. बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याने केलेली कारवाई :-

| अ.क्र. | बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याने केलेली कारवाई | बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याने केलेल्या कारवाईचा दिनांक व तपशील |
|---|---|---|
| १. | पोलिसाकडे केलेला अर्ज | |
| २. | न्याय दंडाधिकाऱ्याकडे किंवा जिल्हा न्यायालयाकडे कलेला अर्ज | |
| ३. | बाल कल्याण समितीकडे केलेला अर्ज | |
| ४. | विधि सेवा प्राधिकरणाकडे केलेला अर्ज | |

**ज. बाल विवाह घटनेच्या अहवालासह ठेवावयाच्या दस्तऐवजांची सूची**

| | |
|---|---|
| १. | जन्मदाखला |
| २. | लग्नपत्रिका |
| ३. | शाळा उपस्थिती अभिलेख |
| ४. | इतर कोणताही दस्तऐवज |

**झ. न्यायालयाकडून आणि /किंवा बाल कल्याण समितीकडून आदेश/हुकूमनामा/घोषणापत्र**

| अ.क्र. | आदेश/हुकूमनामा/घोषणापत्र | आदेशाचे/हुकूमनाम्याचे/घोषणापत्राचे संक्षिप्त वर्णन |
|---|---|---|
| १. | मनाईहुकूम | |
| २. | अभिरक्षा व देखभाल आदेश | |
| ३. | विवाहशून्यतेचा हुकूमनामा | |
| ४. | पदयोजन किंवा पुनःस्थापन आदेश | |
| ५. | शैक्षणिक संस्थेमधील बदल | |
| ६. | बाल कल्याण समितीकडून आदेश | |
| ७. | इतर कोणतेही आदेश | |

## नमुना दोन

[नियम ५(२) पहा]

**बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यास बालकाच्या अनुपस्थितीबद्दल शाळेच्या प्राचार्याकडून किंवा मुख्याध्यापकाकडून माहिती**

| | |
|---|---|
| १. बालकाचे नाव | |
| २. बालकाचा पत्ता | |
| ३. बालकाचे लिंग व जन्म दिनांक | |
| ४. बालकाच्या वडिलांचे नाव | |
| ५. बालकाच्या आईचे नाव | |
| ६. बालकाच्या वडिलांचा व्यवसाय | |
| ७. बालकाच्या आईचा व्यवसाय | |
| ८. शाळेचे नाव | |
| ९. शाळेचा पत्ता | |
| १०. बालक शिकत असलेला वर्ग | |
| ११. ज्या दिनांकापासून बालक शाळेमध्ये अनुपस्थित आहे तो दिनांक | |
| १२. बालकाच्या घरी भेट दिलेल्या शिक्षकाचे नाव | |
| १३. शिक्षकाच्या भेटीचा दिनांक | |
| १४. अनुपस्थित राहण्याची कारणे | |

## नमुना तीन

**[नियम १३(१) पहा]**

**बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याकडून जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याला मासिक अहवाल**

| | |
|---|---|
| १. बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याचे नाव | |
| २. पत्ता | |
| ३. ई-मेल | |
| ४. अहवालाचा महिना व वर्ष | |
| ५. प्राप्त झालेल्या प्रकरणांची संख्या | |
| ६. बाल विवाह प्रतिबंध केलेल्या प्रकरणांची संख्या | |
| ७. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यासमोर दाखल केलेल्या प्रकरणांची संख्या | |
| ८. ज्या प्रकरणी प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याने आदेश पारित केले होते त्या प्रकरणांची संख्या | |
| ९. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यासमोरील प्रलंबित प्रकरणांची संख्या | |
| १०. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याकडील अपिलामधील प्रकरणांची संख्या | |
| ११. न्यायालयामध्ये दाखल केलेल्या प्रकरणांची संख्या | |
| १२. न्यायालयाकडून मिळालेल्या आदेशांची संख्या | |
| १३. मिळालेल्या हुकूमनाम्यांची संख्या | |
| १४. न्यायालयामधील प्रलंबित प्रकरणांची संख्या | |
| १५. न्यायालयाकडील अपिलामधील प्रकरणांची संख्या | |
| १६. ज्या प्रकरणांमध्ये पक्षकारांनी केलेले विवाह शून्य असल्याचे घोषित करणारे घोषणापत्र (न्यायालयात न जाता) बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याकडे सादर केले आहे अशा प्रकरणांची संख्या | |
| १७. बाल कल्याण समितीकडे निर्दिष्ट केलेल्या प्रकरणांची संख्या | |
| १८. ज्या प्रकरणी बाल कल्याण समितीने आदेश पारित केले होते त्या प्रकरणांची संख्या | |
| १९. बाल कल्याण समितीसमोर प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या | |
| २०. बाल कल्याण समितीकडील अपिलामधील प्रकरणांची संख्या | |

| | |
|---|---|
| २१. पोलीस/पदनिर्देशित पोलीस/विशेष बाल न्याय पोलीस कक्ष यांच्याकडे निर्दिष्ट केलेल्या प्रकरणांची संख्या | |
| २२. पोलीस/पदनिर्देशित पोलीस/विशेष बाल न्याय पोलीस कक्ष यांनी केलेल्या कारवाईच्या प्रकरणांची संख्या | |
| २३. ज्या प्रकरणी कोणतीही कारवाई केलेली नाही अशा प्रकरणांची संख्या | |

## नमुना चार

[नियम १३(२) पहा]

### जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याकडून उपायुक्त, बाल विकास यांना तिमाही अहवाल (जाने/एप्रिल/जुलै/ऑक्टो) २०    .

| | |
|---|---|
| १. जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याचे नाव | |
| २. पत्ता | |
| ३. ई-मेल | |
| ४. बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ अन्वये दाखल केलेल्या प्रकरणांची संख्या | |
| ५. बाल विवाहास प्रतिबंध केलेल्या प्रकरणांची संख्या | |
| ६. जिल्हा न्यायालयामध्ये दाखल केलेल्या प्रकरणांची संख्या | |
| ७.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यासमोर दाखल केलेल्या प्रकरणांची संख्या | |
| ८. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याने ज्या प्रकरणी आदेश पारित केले होते त्या प्रकरणांची संख्या | |
| ९. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यासमोर प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या | |
| १०. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यासमोर दाखल केलेल्या प्रकरणांची संख्या | |
| ११. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याने ज्या प्रकरणी आदेश पारित केले होते त्या प्रकरणांची संख्या | |
| १२. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यासमोर प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या | |
| १३. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याकडील अपिलामधील प्रकरणांची संख्या | |
| १४. न्यायालयामध्ये दाखल केलेल्या प्रकरणांची संख्या | |

| | |
|---|---|
| १५. न्यायालयाकडून मिळालेल्या आदेशांची संख्या | |
| १६. न्यायालयाकडून मिळालेल्या हुकूमनाम्यांची संख्या | |
| १७. न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची संख्या | |
| १८. न्यायालयाकडील अपिलामधील प्रकरणांची संख्या | |
| १९. ज्या प्रकरणांमध्ये पक्षकारांनी केलेले विवाह शून्य असल्याचे घोषित करणारे घोषणापत्र (न्यायालयात न जाता) बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याकडे सादर केले आहे अशा प्रकरणांची संख्या | |
| २०. बाल कल्याण समितीकडे निर्दिष्ट केलेल्या प्रकरणांची संख्या | |
| २१. बाल कल्याण समितीने ज्या प्रकरणी आदेश पारित केले होते त्या प्रकरणांची संख्या | |
| २२. बाल कल्याण समितीसमोर प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या | |
| २३. बाल कल्याण समितीकडील अपिलामधील प्रकरणांची संख्या | |
| २४. पोलीस/पदनिर्देशित पोलीस/विशेष बाल न्याय पोलीस कक्ष यांच्याकडे निर्दिष्ट केलेल्या प्रकरणांची संख्या | |
| २५. पोलीस/पदनिर्देशित पोलीस/विशेष बाल न्याय पोलीस कक्ष यांनी ज्या प्रकरणी कारवाई केली होती त्या प्रकरणांची संख्या | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एस. एल. अहिरे,**
शासनाचे सहसचिव.

## WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT,

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 21st October, 2022.

*NOTIFICATION*

Prohibition of Child Marriage Act, 2006.

No. Balvi-2020/C.R.62/Desk-9.—In exercise of the powers conferred by section 19 of the Prohibition of Child Marriage Act, 2006 (6 of 2007) and in supersession of the Maharashtra Prohibition of Child Marriage Rules, 2008, the Government of Maharashtra hereby makes the following rules, namely:—

*1. Short Title.*— These rules may be called the Maharashtra Prohibition of Child Marriage Rules, 2022.

*2. Definitions.— (1) In these rules, unless the context otherwise requires,—*

(*a*) "Act" means the Prohibition of Child Marriage Act, 2006 (6 of 2007);

(*b*) "Child Welfare Committee" means a Child Welfare Committee constituted under section 27 of the Juvenile Justice Act;

(*c*) "Form" means a form appended to these rules;

(*d*) "Juvenile Justice Act" means the Juvenile Justice (Care and Protection of Children) Act, 2015 (2 of 2016).

(*2*) The words and expressions used in these rules but not defined herein shall have the meanings as are respectively assigned to them in the Act.

*3. Duties of Child Marriage Prohibition Officer (CMPO).*— (*1*) In addition to the duties mentioned in sub-section (*3*) of section 16 of the Act, the Child Marriage Prohibition Officer shall discharge the following functions and duties, namely:–

(*a*) To prohibit child marriages, the Child Marriage Prohibition Officer shall,—

(*i*) create awareness of compulsory registration of marriages;

(*ii*) collect and scrutinize data regularly for girl drop outs from schools;

(*iii*) create awareness of the adverse effects of child marriages and for sensitizing the community on the issue of child marriages and to prevent solemnization of child marriages, the Child Marriage Prohibition Officer may, with the help of persons working in the field of protection of women and children or professionals including councellors, lawyers, health care providers, psychiatrists,–

(*a*) use print, broadcast and all other forms of media;

(*b*) organize lectures of experts in law, social work, psychology, medicine, psychiatry, health care providers and other experts;

(*c*) organize awareness drives and campaigns;

(*d*) organize visits to educational institutions.

(*iv*) inform the District Magistrate or the District Child Protection Unit established under the Juvenile Justice Act to plan preventive strategies on special occasions like *Holi, Akshaya Tritaya,* when mass marriages are likely to happen;

(*v*) inform the police and file First Information Report to stop the offences in relation to child marriages;

(*vi*) inform the Child Welfare Committee to take appropriate preventive measures to stop the child marriage;

(*vii*) keep updated list of various stakeholders, like Non-Government Organisations working on issues of women and children, counsellors, health care providers, lawyers, legal services authorities, etc.;

(*viii*) inform child, parents, guardians involved in child marriage about various schemes of the Government and suggest them to apply for obtaining benefit under the applicable Schemes;

(*ix*) keep vigilance in the area under his jurisdiction for eliminating the possibility of solemnization of child marriage;

(*x*) collect information regarding mass child marriages within his jurisdiction;

(*x*) encourage Gram Sabha to pass a resolution against solemnization of child marriages in their village.

(*b*) When the child marriage is being solemnized, the Child Marriage Prohibition Officer shall,—

(*i*) if he receives reliable information that a child marriage is likely to be solemnized, he in such an emergency situation shall seek immediate help of the Police or the Child Welfare Committee or District Child Protection Unit and visit the place of incident and record the Child Marriage Incidence Report in Form I and submit it to the Judicial Magistrate First Class or Metropolitan Magistrate without any delay for seeking appropriate orders under the Act;

(*ii*) in emergency, the Child Marriage Prohibition Officer in presence of two reliable witnesses or respectable members or members of Child Line or members of non-Government Organisation from the community may visit the place where child marriage is likely to be solemnized for taking immediate action to stop the solemnization of child marriage;

(*iii*) take steps for age verification of the child;

(*iv*) file an application before the Judicial Magistrate or a Metropolitan Magistrate for injunction order or *ex-parte* interim injunction order under section 13 of the Act against any person including a member of an organization or an association of persons prohibiting such marriage;

(*v*) to assist the aggrieved person in filing an application in the Court of a Judicial Magistrate or a Metropolitan Magistrate, as the case may be, regarding the offences committed under the Act;

(*vi*) immediately inform Child Welfare Committee and take all necessary steps as directed by Child Welfare Committee to place such child, if need be, in a State funded residential school, shelter home, or any other safe place where the child being in need of care and protection is placed as per the provisions of the Juvenile Justice Act.

(*c*) After the child marriage is solemnized, the Child Marriage Prohibition Officer shall,—

(*i*) collect all evidences like age proof, marriage invitation, marriage photo, etc.;

(*ii*) file a complaint with the Police or a Judicial Magistrate or a Metropolitan Magistrate, as the case may be in respect of offences committed under the Act;

(*iii*) take assistance of the Child Welfare Committee to rescue the child if need be and give the required care and protection as directed by the Child Welfare Committee;

(*iv*) assist the child, parents, guardians in accessing services like counselling, healthcare, shelter home, legal aid, etc.;

(*v*) assist the aggrieved person in filing an application in the Court of a Judicial Magistrate or a Metropolitan Magistrate, as the case may be, regarding the offences committed under the Act;

(*vi*) assist in filing petition for annulling a child marriage by a decree of nullity; and in case the petitioner is minor at the time of filing a petition, then file a petition alongwith his or her guardian or next friend as per the provisions of sub-section (*2*) of section 3;

(*vii*) inform the police authorities including the special police officers appointed under the Immoral Traffic (Prevention) Act, 1956 (104 of 1956), if he comes to know of the solemnization of any child marriage wherein the child being minor, is,—

(*a*) taken or enticed out of the keeping of the lawful guardian; or

(*b*) compelled by force; or

(*c*) induced by any deceitful means to go from any place; or

(*d*) sold for the purpose of marriage and made to go through a form of marriage; or

(*e*) married and after which is sold or trafficked or used for immoral purposes.

*4. Duties of Police, Designated Police and Special Juvenile Police Unit.— The police, Designated Police and Special Juvenile Police Unit shall have the following duties:—*

(*a*) to assist Child Marriage Prohibition Officers while performing their duties as specified under the Act and rules made thereunder in prohibiting solemnization of child marriages;

(*b*) on receipt of information about child marriage, the police shall record the same into station diary and collect evidence;

(*c*) to register First Investigation Report (FIR) on receiving information from reliable source about solemnisation of child marriage;

(*d*) to take immediate action under appropriate laws on receiving information from Child Marriage Prohibition Officer under these rules;

(*e*) in emergency situation, where child marriage likely to be solemnized, upon request of the Child Marriage Prohibition Officer assist him and visit the place of occurrence such marriage;

(*f*) to take action as per the orders of the Court.

*5. Information to Child Marriage Prohibition Officer.*— (*1*) Any person, organization or educational institution who has reason to believe that a child marriage has been, or is being, or is likely to be solemnized or the child, himself or herself may give information through letter, e-mail or a telephone call or call on Child Helpline Number 1098 or in any other form, either in writing or orally, to the Child Marriage Prohibition Officer having jurisdiction in the area or any other Child Marriage Prohibition Officer.

(*2*) If any child is absent from school for a continuous period of more than fifteen days without any information to the school authorities, it shall be the responsibility of the School Principal or Head Master to find out the reason for absenteeism of such child and if it is due to child marriage, the School Principal or Head Master shall inform in Form II to the Child Marriage Prohibition Officer in whose jurisdiction the school is located.

(*3*) Upon receipt of information that a child marriage has been, or is being, or is likely to be solemnized, the Child Marriage Prohibition Officer shall prepare a Child Marriage Incident Report in Form I and submit the same to the Judicial Magistrate First Class or the Metropolitan Magistrate and forward copies thereof to the Police officer in charge of the Police station within whose jurisdiction the child marriage alleged to have been, or is being or is likely to be solemnized.

(*4*) Notwithstanding anything contained in these rules, the Child Marriage Prohibition Officer shall not refuse to record information regarding the child marriage on the ground that the child marriage alleged to have been, or is being or is likely to be solemnized outside the area of his jurisdiction. He shall record and pass such information immediately through email, telephone, mobile message or any other mode of communication to the concerned Child Marriage Prohibition Officer having jurisdiction.

(*5*) If a complaint regarding domestic violence is received by the Child Marriage Prohibition Officer, he shall send that information immediately to the concerned Protection Officer appointed under the Protection of Women from Domestic Violence Act, 2005 (43 of 2005).

(*6*) If a complaint regarding sexual abuse of the child who has been married or likely to be married is received by the Child Marriage Prohibition Officer, he shall mandatorily report it to the police as provided under section 19 of the Protection of Children from Sexual Offences Act, 2012 (32 of 2012).

(*7*) The Child Marriage Prohibition Officer shall give a copy of the Child Marriage Incident Report under his signature immediately to the informant, free of cost.

(*8*) The Child Marriage Prohibition Officer shall maintain the confidentiality of the identity of persons or organizations communicating information about child marriage to him. However, he may disclose identity of such persons or organizations to the concerned police officer if there is a danger to the life or the property of the person/s or organization giving such information.

*6. Inquiry by Child Marriage Prohibition Officer.— (1) The Child Marriage Prohibition Officer on receipt of information about the offence which is committed or is likely to be committed under this Act, shall inquire the matter for which, he may,—*

(*a*) enter the premises where the child marriage is likely to take place or has taken place and make necessary inquiry;

(*b*) demand production of documents such as birth certificates, school leaving certificates or medical documents proving the age of bride and groom;

(*c*) record statements of witnesses and of any other persons who are able to furnish any kind of evidence about child marriage;

(*d*) collect any other evidence that is essential to prosecute the persons who have committed any of the offences under the Act;

(*e*) record details of his inquiry and progress in an individual case file maintained for that child, including specifications such as time at receipt of information, date and time on which the inquiry began or closed, the places visited and the statement of circumstances ascertained through his inquiry;

(*f*) complete every such inquiry within three months.

(*2*) During inquiry if the Child Marriage Prohibition Officer comes to the conclusion that offences are also committed under the Indian Penal Code,1860 (XLV of 1860) or any other Act, he shall inform the same to the concerned police officer for further necessary action in respect thereof.

*7. Age verification of child involved in Child Marriage.—*

(*1*) If the Child Marriage Prohibition Officer has reasonable doubt regarding the age of the child whose marriage is about to take place, he shall ask for the following documents:—

(*a*) verification of date of birth from the school record or matriculation or equivalent certificate from the concerned examination Board, if available and;

(*b*) in the absence of documents mentioned in clause (a) above, birth certificate given by Local Authority.

(*2*) If no documents are available, he may refer the matter to the Child Welfare Committee for the age verification.

*8. Procedure to be followed by Child Welfare Committee.—* (*1*) On receipt of any information from the Child Marriage Prohibition Officer or suo motu, the Child Welfare Committee in case of a child, who is at imminent risk of marriage before attaining the age of marriage and whose parents, family members, guardian and any other person/s are likely to be responsible for the solemnization of such marriage, shall consider the child as a child in need of care and protection as per clause (14) of section 2 of the Juvenile Justice Act and take appropriate actions under the provisions of the Juvenile Justice Act.

(*2*) The Child Welfare Committee shall ensure that the education of the child is continued in the same school.

(*3*) Wherever required, the Child Welfare Committee shall first try to provide non-institutional services to the child and institutionalization to be the last resort.

(*4*) The Child Welfare Committee shall ensure the safety and protection of the child.

(*5*) The Child Welfare Committee shall follow the principle of 'best interest' of the child in all decisions relating to the child.

*9. Non-disclosure of identify of child.*— (*1*) The media, print digital or electronic, while creating awareness about child rights and adverse effects of child marriages shall report about child marriages in a sensitive manner without disclosing the identity of the child.

(*2*) The Child Marriage Prohibition Officer, Child Welfare Committee, Child Care Institution, police or any organization or institution shall not disclose the identity of the child.

*10. Custody and Maintenance of Children born of Child Marriage.*— (*1*) The Child Marriage Prohibition Officer shall make an application to the District Court for an order under section 5 of the Act for the custody and maintenance of children born of child marriage.

(*2*) The Child Marriage Prohibition Officer shall assist for the compliance of the District Court's orders in respect of the custody and maintenance to be provided to the child by a party or parties to the marriage or their guardians.

*11. Reports.*— (*1*) Every Child Marriage Prohibition Officer shall submit a monthly report, in the first week of every month in Form III to the District Women and Child Development Officer about the actions taken by him under the Act and these Rules within his jurisdiction.

(*2*) Every District Women and Child Development Officer shall submit a quarterly report in Form IV to the Deputy Commissioner, Child Development on the basis of monthly report by the Child Marriage Prohibition Officer in respect of actions taken under the Act and these Rules within his jurisdiction.

*12. Action in case of non-performance of duties.*— If, any Child Marriage Prohibition Officer or District Women and Child Development Officer fails to perform any of his duties specified in the Act and these Rules without having sufficient reasons for non-performance or flouts any order of Court under this Act, then he shall be subject to the disciplinary actions under the concerned Service Rules applicable to them, in addition to any other actions under the Act or any other law in force.

FORM I

(*See rules 3 (b)(i)&5(3)*)

Child Marriage Incident Report

*A. Details of the child:—*

| | |
|---|---|
| 1. Name of the child | |
| 2. Age | |
| 3. Sex | |
| 4. Address of child's parent's residence | |
| 5. Name of the child's father | |
| 6. Occupation of the father | |
| 7. Name of the mother | |
| 8. Occupation of the mother | |
| 9. Present address of the child | |

*B. Details of the educational Institute where the child is studying:—*

| | |
|---|---|
| 1. Name of the educational/vocational/ training Institute | |
| 2. Address of the educational institute | |
| 3. Class of the child | |
| 4. Is she/he attending the school: | Yes/No |
| 5. If no, in which year did the child stop schooling: | |
| 6. If he/she is not going to school give details of what he/she is presently doing. | |
| 7. Write reasons if the child never went to school. | |

C. Details of the person against whom complaint / First Investigation Report is lodged.

| Sr. No. | Name | Relationship with the child | Phone no | Address of residence |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |
| 4. | | | | |
| 5. | | | | |

*D. Receipt of the information related to child marriage by the Child Marriage Prohibition Officer:—*

| | |
|---|---|
| Was the information received before the marriage was performed? | Y/N |
| Was the information received during the marriage performance? | Y/N |
| Was the information received after the marriage was performed? | Y/N |

*E. Details about the incidence/s of child marriage:—*

| Sr. No. | Date, Time and Place | Person responsible for the child marriage | Details of the incidence | Remarks |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

*F. Assistance required by the child:—*

| Sr. No | Assistance required by the child | Person/Organisation by whom assistance is provided | Any other detail/s |
|---|---|---|---|
| 1. | Medical aid | | |
| 2. | Legal aid | | |
| 3. | Counselling | | |
| 4. | Police | | |
| 5. | Shelter | | |
| 6. | Any other | | |

*G. Action taken by Child Marriage Prohibition Officer:—*

| Sr. No | Action by Child Marriage Prohibition Officer | Date and details of action by Child Marriage Prohibition Officer |
|---|---|---|
| 1. | Application to the Police | |
| 2. | Application to the Judicial Magistrate or District Court | |
| 3. | Application to Child Welfare Committee | |
| 4. | Application to Legal Services Authority | |

*H. List of documents to be kept alongwith Child Marriage Incidence Report:—*

| | |
|---|---|
| 1. | Birth Certificate |
| 2. | Wedding card |
| 3. | School attendance record |
| 4. | Any other Document |

*I. Orders / Decree / Declaration from the Court and / or Child Welfare Committee:—*

| Sr. No. | Order/Decree/ Declaration | Description in brief of the Order/Decree/Declaration |
|---|---|---|
| 1. | Injunction Order | |
| 2. | Custody and maintenance Order | |
| 3. | Nullity Decree | |
| 4. | Placement or Restoration Order | |
| 5. | Change in educational institution | |
| 6. | Orders from Child Welfare Committee | |
| 7. | Any other orders | |

FORM II

(*See* rule 5(2))

**Information by School Principal or Head Master about absenteeism of child to Child Marriage Prohibition Officer**

| | |
|---|---|
| 1. Name of the child | |
| 2. Address of the child | |
| 3. Sex and Date of Birth of the child | |
| 4. Name of the child's father | |
| 5. Name of the child's mother | |
| 6. Occupation of the child's father | |
| 7. Occupation of the child's mother | |
| 8. Name of the School | |
| 9. Address of the School | |
| 10. Class in which the child is studying | |
| 11. Date from which the child is absent in school | |
| 12. Name of the teacher who visited to child's home | |
| 13. Date of teacher's visit | |
| 14. Reasons for being absent | |

FORM III

(*See* rule 13(1))

**Monthly Report from Child Marriage Prohibition Officer to District Women and Child Development Officer**

| | |
|---|---|
| 1. Name of Child Marriage Prohibition Officer | |
| 2. Address | |
| 3. Email | |
| 4. Month and year of Report | |
| 5. No. of cases received | |
| 6. No. of cases where child marriage was prevented | |
| 7. No. of cases filed before Judicial Magistrate First Class | |
| 8. No. of cases in which orders were passed by Judicial Magistrate First Class | |
| 9. No. of pending cases before Judicial Magistrate First Class | |
| 10. No. of cases in Appeal from Judicial Magistrate First Class | |
| 11. No. of cases filed in Court | |
| 12. No. of orders got from Court | |
| 13. No. of decrees got from Court | |
| 14. No. of pending cases in Court | |
| 15. No. of cases in Appeal from Court | |
| 16. No. of cases in which declarations declaring marriage void prepared by parties (without approaching the Court) submitted to Child Marriage Prohibition Officer | |
| 17. No. of cases referred to Child Welfare Committee | |
| 18. No. of cases where orders were passed by Child Welfare Committee | |
| 19. No. of cases pending before Child Welfare Committee | |
| 20. No. of cases in appeal from Child Welfare Committee | |
| 21. No. of cases referred to Police/Designated Police/Special Juvenile Police Unit | |
| 22. No. of cases action taken by the Police/ Designated Police/ Special Juvenile Police Unit | |
| 23. No. of cases where no action was taken | |

FORM IV

(*See* rule 13(2))

**Quarterly report from District Women and Child Development Officer to Deputy Commissioner, Child Development (Jan/April/July/Oct) 20__**

| | |
|---|---|
| 1. Name of District Women and Child Development Officer : | |
| 2. Address | |
| 3. Email | |
| 4. No. of cases filed under the Prohibition of Child Marriage Act, 2006 | |
| 5. No. of cases where child marriage was prevented | |
| 6. No. of cases filed in District Court | |
| 7. No. of cases filed before Judicial Magistrate First Class | |
| 8. No. of cases in which orders were passed by Judicial Magistrate First Class | |
| 9. No. of pending cases before Judicial Magistrate First Class | |
| 10. No. of cases filed before Judicial Magistrate First Class | |
| 11. No. of cases in which orders were passed by Judicial Magistrate First Class | |
| 12. No. of pending cases before Judicial Magistrate First Class | |
| 13. No. of cases in Appeal from Judicial Magistrate First Class | |
| 14. No. of cases filed in Court | |
| 15. No. of orders got from Court | |
| 16. No. of decrees got from Court | |
| 17. No. of pending cases in Court | |
| 18. No. of cases in Appeal from Court | |
| 19. No. of cases in which declarations declaring marriage void prepared by parties (without approaching the Court) submitted to Child Marriage Prohibition Officer | |
| 20. No. of cases referred to Child Welfare Committee | |
| 21. No. of cases where orders were passed by to Child Welfare Committee | |

| | |
|---|---|
| 22. No. of cases pending before to Child Welfare Committee | |
| 23. No. of cases in appeal from to Child Welfare Committee | |
| 24. No. of cases referred to Police/ Designated Police/ Special Juvenile Police Unit | |
| 25. No. of cases where action was taken by Police/Designated Police/ Special Juvenile Police Unit | |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. L. AHIRE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.